**प्रेसनोट**

जा.क्र. २६५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– १८/०७/२०१८

## '' कुख्यात फरार गुंडास अग्निशस्त्रासह जिल्हा रेड पथकाने केले अटक''

गोंदिया जिल्हयातील अनेक गुन्हयात मागील एक वर्षा पासुन फरार असलेला कुख्यात आरोपी नामे सहेजाद उर्फ बंदे सब्बीर खान पठाण, वय २५ वर्ष, रा. रेल टोली, पाल चौक, गोंदिया यास पोलीस अधिक्षक भंडारा यांचे जिल्हा रेड पथकाने बेला, जिल्हा भंडारा येथुन दिनांक १७.०७.२०१८ चे रात्र दरम्यान अग्निशस्त्र (देशी कटटा) व दोन जिवंती काडतुससह अटक केले. ही कार्यवाई जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, पोलीस ठाणे गोंदिया शहर, रामनगर, रावणवाडी, गोंदिया ग्रामिण परिसरात अनेक गुन्हेगारी कार्यवायामध्ये असहभागी असलेला. खुन, खुनाचा प्रयत्न, बलात्कार, अपहरन, खंडणी तसेच मोक्का अशा विविध गंभिर गुन्हयामध्ये फरार असलेला व गनी खान गॅगचा महत्वाचा सदस्य असलेला सहेजाद उर्फ बंदे सब्बीर खान पठाण याची गोंदिया पोलीसांना आवश्यकता असल्याने मागील एक वर्षा पासुन शोध घेत होते.

सहेजाद उर्फ बंदे सब्बीर खान पठाण याचे गोंदिया पोलीसांचे अभिलेखावर महत्वाचा गुन्हेगार म्हणुन नोंद असुन तो मागील एक वर्षा पासुन वेशांतर करून वेगवेगळया ठिकाणी राहत असल्याने व सदर आरोपी हा कुख्यात असल्याने त्याची पोलीसांना माहिती देणारास जिवानीशी ठार मारणार या भितीने समाजातुन त्याबाबत पोलीसांना माहिती प्राप्त होत नव्हती.

सदर आरोपी पोलीस अधिक्षक भंडारा श्रीमती विनीता साहू यांना जिल्हा हददीत असल्याबाबत माहिती मिळाली त्यांचे मार्गदर्शनात जिल्हा रेड पथकाचे प्रमुख पोलीस उप निरीक्षक, जितेंद्र आडोळे, स.फौ. अश्विनकुमार मेहर, पो.हवा. रूपचंद जांगळे, पो.ना. प्रदिप डाहारे, विनोद शिवणकर, धिरज पिदुरकर, सचिन गाढवे यांनी आरोपी सहेजाद उर्फ बंदे सब्बीर खान पठाण याचे हालचाली बाबत विशेष माहिती काढली. सदर आरोपी हा आपले सोबत

(अग्निशस्त्र) देशी कटयासह ओळख लपवुन बेला येथे नवनिर्माणाधीन असलेल्या ढाब्यावर राहत असल्याचे आढळले त्यावरून जिल्हा रेड पथक व शिर्घ कृती दलातील पो.ना. ५०, पो. शि. ३३३, १३५८, १४४६, १५४२ यांनी सापळा रचुन दिनांक १८.०७.२०१८ चे रात्र दरम्यान ताब्यात घेतले त्याचे अंगझडतीत देशी कटटा व दोन जिवंत काडतुसे मिळुन आली. आरोपी विरूध्द पोलीस ठाणे भंडारा कलम ३,२५ भारतीय हत्यार कायदा १९५९ नुसार गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपी बाबत गोंदिया जिल्हा पोलीसांना काळविण्यात आले आहे.

(वाय.एम.सोलसे)
**प्रभारी पोलीस उपअधीक्षक (गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ७०३८०४६३९९**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आह

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.